# University of Mumbai

परीक्षा विभाग/
वाणिज्य निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई — ४०००९८

क्र.परीक्षा/वाणिज्य निकाल कक्ष/ ७८५६/२०१७

परिपत्रक :—

प्रमुख/संचालक, वाणिज्य विभाग, मुंबई विद्यापीठ प्राचार्य/संचालक, विद्यापीठाशी संलग्नित असलेले वाणिज्य विद्याशाखेतील पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम चालविणारी महाविद्यालये व सहायक कुलसचिव रत्नागिरी व ठाणे उपकेंद्र यांना सुचित करण्यात येते की, एम्.कॉम सत्र १, २, ३ व ४ एप्रिल/मे २०१७, एम्.कॉम सत्र १ आणि २ (Choice Based) (प्रथम सत्र २०१७) मध्ये घेण्यात येणा—या परीक्षा प्रवेश अर्ज Online या वेब लिंक वरून muexam.in स्विकारण्यात येणार आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | परीक्षा | परीक्षा शुल्क | Online अर्ज भरण्याची व Inward करण्याच्या तारखा | Form Submission Report व विहित शुल्क विद्यापीठात जमा करण्याच्या तारखा |
|---|---|---|---|---|
| १. | M.Com. (Sem. I & III) (CBSGS) & M.Com. (Sem. I) (Choice Based) | नियमित शुल्क | ६ एप्रिल, २०१७ ते १० एप्रिल, २०१७ | १२ एप्रिल, २०१७ |
| २. | | विलंब शुल्क रू. १००/— सहित | ११ एप्रिल, २०१७ ते १३ एप्रिल, २०१७ | १७ एप्रिल, २०१७ |
| ३. | | अतिविलंब शुल्क रू. ५००/— सहित | १४ एप्रिल, २०१७ ते १८ एप्रिल, २०१७ | २० एप्रिल, २०१७ |

| अ. क्र. | परीक्षा | परीक्षा शुल्क | Online अर्ज भरण्याची व Inward करण्याच्या तारखा | Form Submission Report व विहित शुल्क विद्यापीठात जमा करण्याच्या तारखा |
|---|---|---|---|---|
| १. | M.Com. (Sem. II & IV) (CBSGS) M.Com. (Sem. II) (Choice Based) | नियमित शुल्क | ६ एप्रिल, २०१७ ते १५ एप्रिल, २०१७ | १८ एप्रिल, २०१७ |
| २. | | विलंब शुल्क रू. १००/— सहित | १६ एप्रिल, २०१७ ते २० एप्रिल, २०१७ | २४ एप्रिल, २०१७ |
| ३. | | अतिविलंब शुल्क रू. ५००/— सहित | २१ एप्रिल, २०१७ ते २५ एप्रिल, २०१७ | २८ एप्रिल, २०१७ |

ता. क. M.Com. (Sem. IV)परीक्षेचे अर्ज सादर करताना विद्यापीठ अध्यादेश क्र. ०.५९८२ यांचे तंतोतंत पालन करावे. विद्यापीठ अधिनियम क्रमांक ०.५९८२ खालीलप्रमाणे:—

"0.5982 : However no learner, will be allowed to appear for Sem.IV examination unless he/she has passed all the course of Sem. I & II examination previously"

उपरोक्त अधिनियमांचे उल्लघंन करून एखाद्या विद्यार्थ्याचा परीक्षेचा अर्ज विद्यापीठास सादर केल्यास यामुळे भविष्यात काही कायदेशीर न्यायालयीन बाबी उद्‌भवल्यास यांची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची असेल यांची नोंद घ्यावी.

२/—

# University of Mumbai



वर नमुद केलेल्या तारखांचा तपशीलाप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील वरील नमुद केलेल्या परीक्षांसाठी प्रविष्ठ होण्यास पात्र असलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा प्रवेश अर्ज mu.ac.in या वेब लिंक वर Online भरून ते आपल्या महाविद्यालयाच्या Login मध्ये Inward करून घ्यावेत व सदर अर्जासोबत विद्यार्थ्यांचे मागील सत्रांचे/परीक्षांचे गुणपत्रिकांच्या छायांकित (गुणपत्रिका संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांना साक्षांकित केलेल्या असणे आवश्यक आहे.) प्रती जोडून हे अर्ज, Form Submission Report ची प्रिंट व विहीत परीक्षा शुल्क विद्यापीठाच्या परीक्षा विभागात हस्तेपोच जमा करावी. पोस्टाने अथवा कुरिअरने स्विकारले जाणार नाहीत.

परीक्षा अर्ज विद्यापीठात जमा करताना ह्या अर्जोचे सत्र निहाय असे गठ्ठे बांधूनच विद्यापीठात जमा करावे, जेणेकरून ह्या अर्जांची छाणणी करणे सुलभ होईल.

परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्याच्या विलंब शुल्काच्या शेवटच्या दिवशी रात्री १२.०० वाजता **M.Com. (Sem. I & III) (CBSGS) & M.Com. (Sem. I) (Choice Based)** (२०/०४/२०१७) आणि **M.Com. (Sem. II & IV) (CBSGS) & M.Com. (Sem. II) (Choice Based)** (२८/०४/२०१७) Inward Link आपोआप बंद होणार असल्यामुळे परीक्षा अर्ज Inward करता येणार नाहीत व परीक्षा स्विकारण्याची मुदत कोणत्याही परिस्थीतीत वाढवून दिली जाणार नाहीत या बाबींची नोंद घेण्यात यावी.

परीक्षा प्रवेश अर्ज Inward झाल्यानंतर कोणतीही दुरूस्ती करता येणार नाही, यामुळे परीक्षा अर्ज Inward करण्यापूर्वी महाविद्यालयांनी संबंधीत विद्यार्थ्यांचे नांव (इंग्रजी व मराठी या दोन्ही लिपीत), विषय व इतर सर्व माहिती अचुक व बरोबर याची खात्री करून घ्यावी.

जे विद्यार्थी द्वितीय सत्र २०१६ च्या एम्.कॉम सत्र १ व २ च्या परीक्षेस प्रविष्ठ होऊन अनुत्तीर्ण झाले असतील व त्यांनी पुर्नमुल्यांकनासाठी विद्यापीठाकडे अर्ज सादर केला असेल, अशा विद्यार्थ्यांचे प्रथम सत्र २०१७ मध्ये होणाऱ्या एम्.कॉम सत्र ४ या परीक्षांसाठी परीक्षा प्रवेश अर्ज (Provisional Basis) व त्यांच्या पुर्नमुल्यांकनाच्या निकालाची प्रतिक्षा न करता विहित मुदतीत म्हणजेच परिपत्रक जाहिर केल्यापासून विहित शुल्कासहित सादर करावेत तसेच फेरतपासणी/ पुर्नमुल्यांकन च्या प्रक्रियेत संबंधित विद्यार्थी एम्.कॉम सत्र १ किंवा २ मध्ये पुन्हा अनुत्तीर्ण झाल्यास त्यांचा एम्.कॉम सत्र ४ या परीक्षेचा निकाल रद्दबाद करण्यात येईल अशा प्रकारचे हमी पत्र महाविद्याल्याने संबंधित विद्यार्थीकडून घेतल्यानंतरच सदर विद्यार्थ्यांचा एम्.कॉम सत्र ४ चा परीक्षा अर्ज विद्यापीठास सादर करावा अशा विद्यार्थ्याची संपुर्ण जबाबदारी महाविद्यालयाकडे राहील तसेच अशा विद्यार्थ्यांची वेगळी यादी महाविद्यालयाने विद्यापीठास सादर करावी जेणे करून परीक्षा प्रवेश सत्र (Hall-Tickets) देण्याचे सोईचे होईल.

जे विद्यार्थी श्रेणी सुधारणीसाठी (Grade Improvement) अर्ज करणार आहेत त्यांनी प्रचलीत पद्धतीनुसार (Hard Forms) परिक्षा प्रवेश अर्ज भरून त्यासोबत सर्व सेमिस्टरच्या (Sem. I, II, III & IV) उत्तीर्ण गुणपत्रिकांच्या छायांकित प्रती जोडून वरील तारखांनुसार परीक्षा विभागात सादर करावेत.

**<u>ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र online पध्दतीने Inward झाले नाही तर त्या विद्यार्थ्यांनि आपले परीक्षा आवेदनपत्र पारंपारिक पद्धतीने (Hard Copy स्वरूपात) वरील नमुद केलेल्या तारखांच्या वेळापत्रकाप्रमाणे भरून विद्यापीठाकडे पाठवावेत.</u>**

तसेच M.Com (Sem IV)(CBSGS), या परीक्षेसाठी नियमित म्हणून प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कामध्ये रू.२५०/— पदवी प्रमाणपत्र शुल्क भरणे अनिवार्य आहे.

# University of Mumbai



(परीक्षा अर्ज भरताना विद्यार्थ्यांना मराठी (देवनगरी) नाव टाकणे बंधनकारक आहे व तेच नाव त्यांच्या पदवी (Degree) प्रमाणपत्रात छापण्यात येईल. अन्यथा चूक झाल्यास विद्यार्थी जबाबदार राहील.)

**(टिप्पणी :–** विद्यार्थी परिक्षाअर्ज mu.ac.in या संकेत स्थळावर जाऊन Online भरून त्यांची प्रिंट घेऊन आवश्यक त्या कागद पत्रासोबत संबंधित महाविद्यालयाच्या कार्यालयास जमा करून परिक्षा शुल्क विहीत मुदतीत भरणे अनिवार्य आहे यांची नोंद घ्यावी.)

तरी या परिपत्रकामध्ये नमुद असलेल्या सर्व बाबींची तंतोतंत पालन करण्यात यावे.

वरील सर्व बाबींची संबंधीतांनी नोद घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.

(Web Link :- mu.ac.in → exam & results → examinations → follow the instruction given on the page)

स्थळ : मुंबई.
दि. ०५/०४ /२०१७.

स्था. संचालक
परिक्षा व मुल्यमापन मंडळ

---

**मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व संबंधीत महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक**

अ. प्रत माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित —

१. प्रभारी संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, परीक्षा विभाग
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग व वित्त व लेखा विभाग
३. सहायक कुलसचिव, रत्नागिरी व ठाणे उपकेंद्र

ब. प्रत माहितीसाठी अग्रेषित —

१. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ.
२. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ३२.
३. मा. प्र. कुलगुरू, मा. संचालक बीसीयुडी, कुलसचिव व परीक्षा नियत्रंक यांचे स्विय सहायक

स्था. संचालक
परिक्षा व मुल्यमापन मंडळ